# B.A.II. Sem III

# Paper No - III Social Issues In India

# भारतातील सामाजिक मुद्दे /समस्या /प्रश्न

## Topic 1 Social Issues

## सामाजिक मुद्दे /समस्या/ प्रश्न

A. Nature of Social Issues

सामाजिक समस्यांचे स्वरूप

प्रस्तावना -

सामाजिक समस्यांचा अभ्यासाला समाजशास्त्र मध्ये अनन्य साधारण महत्त्व दिले जाते. याचे कारण सामाजिक समस्यांचा दृश्य परिणाम मानवी समाजावर होत असतो. सामाजिक समस्या या मानवनिर्मित आहेत. त्याचे चांगले वाईट परिणाम मानवी समाजाला भोगावे लागतात त्याबरोबरच सामाजिक समस्यांचे स्वरूप मानव समाजामध्ये सार्वत्रिक स्वरूपाचे आहे सद्यस्थितीमध्ये सामाजिक समस्यांनी संपूर्ण समाजव्यवस्थेला व्यापलेली आहे भारतीय समाजाचा विचार करता भारतातही अनेक सामाजिक समस्या तीव्र स्वरूपात भेडसावत आहेत.

* समाजिक समस्या : अर्थ व स्वरूप

समस्या या संकल्पनेसाठी प्रॉब्लेम हा इंग्रजी शब्द वापरला जातो या शब्दाचा अर्थ असा प्रश्न की ज्याची सोडवणूक किंवा निराकरण केले पाहिजे सामाजिक समस्या समाजातील एखाद्या व्यक्तीशी किंवा ठराविक व्यक्तींची संबंधित नसतात तर त्या समाजातील बहुसंख्य लोकांना भेडसावत असतात एखादा व्यक्तिगत प्रश्न संबंधित व्यक्तीने सोडविणे अपेक्षित असते तर सामाजिक समस्या प्रश्न बहुसंख्य लोकांची संबंधित असल्याने ते सोडवण्यासाठी देखील बहुसंख्य लोकांनी प्रयत्न करणे आवश्यक असते सामाजिक समस्येच्या संदर्भात व्यक्तिगत अर्थ अभिप्रेत नसून त्याचे सामाजिक स्वरूप अभिप्रेत आहे सामाजिक विघटन आम मधून सामाजिक समस्यांची निर्मिती होते त्यामुळे सामाजिक समस्या सार्वत्रिक ऐतिहासिक व समाजसापेक्ष असतात एकोणिसाव्या शतकात भारतात सती प्रथा बालविवाह अस्पृश्यता स्त्रियांची संबंधित समस्या अशा समस्या अस्तित्वात होत्या आज मात्र भ्रष्टाचार दारिद्र्य बेकारी दहशतवाद यासारख्या समस्या निर्माण झालेले आहे समस्यांचा अभ्यास करण्यापूर्वी सामाजिक समस्या म्हणजे काय हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

व्याख्या:

1. रुबिंगटन आणि विनबर्ग-

" सामाजिक समस्या  म्हणजे अशी आक्षेपार्ह परिस्थितीकी जी बहुसंख्य लोकांच्या सामाजिक मूल्यांची विसंगत असते आणि ती बदलण्यासाठी प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता असते असे बहुसंख्य जणांना वाटते.

2.फुल्लर व मायर्स :

" सामाजिक  समस्या  म्हणजे असे वर्तन प्रकार किंवा परिस्थिती ही जी त्या समाजातील अनेक सदस्यांना अनिष्ट वाटते अशी  परिस्थिती सोडवण्यासाठी किंवा त्याची व्याप्ती कमी करण्यासाठी काही योजना धोरणे  व प्रत्यक्ष कार्याची  आवश्यकता  असते व त्यास या सदस्यांची मान्यता असते".

3.निस्बेट :

" समस्या म्हणजे एखाद्या  समाजातील लक्षणीय व्यक्तींच्या सामाजिक वर्तनातील बिघाड की ज्याचे परिणाम गंभीर स्वरूपात समाजातील इतर अनेक सदस्यांना भोगावे लागतात".

सामाजिक  समस्या  ही  एक  अशी  परिस्थिती  आहे  की ज्या परिस्थितीत समाजातील सदस्यांचे वर्तन हे समाजमान्य प्रमाणकांशी विसंगत असते. अशा परिस्थितीकडे समाजातील बहुसंख्य विचारवंतांचे लक्ष वेधले जाते व त्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक मानले जातात.

* सामाजिक समस्येची वैशिष्ट्ये: सामाजिक समस्या ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी सामाजिक समस्यांची काही वैशिष्ट्ये स्पष्ट केली जातात ती पुढीलप्रमाणे

1.बहुसंख्य सदस्यांचे मत - मानवी  समाजात निर्माण झालेली विशिष्ट परिस्थिती ही  त्या समाजातील नियमांचा,आदर्श समाजमान्य वर्तन प्रकारांचा भंग उल्लंघन करणारी असून ही परिस्थिती समाजासाठी विघातक आहे, अशी धारणा त्या समाजातील जास्तीत जास्त लोकांची